प्रथम अपिल "ब"

# सुचना का अधिकार 2005

प्रति
प्रथम अपिलीय अधिकारी दिनांक : .............. 2018
पाणी पुरवठा विभाग
मिराभाईंदर महानगरपालिका

1 आवेदक का पुरा नाम : श्री एस आर तिवारी (प्रधान संपादक बजरंग प्रहार)

2. पता : लाल बहादुर शास्त्री नगर
गल्ली नं डी 04
रूम नं सी 331
भायंन्दर पोलिस स्टेशन के पिछे
भायंन्दर पश्चिम ठाणे
मो0 : 9920936625 व 9323989555

| | |
|---|---|
| मि. भा. म<br>पाणी पुरवठा | |
| आ. क्र. | २८ |
| दिनांक | २८।४।१८ |
| कार्यकारी अभियंता | |

3 सुचना अधिकारी का विवरण : शासकिय सुचना अधिकारी.
पाणी पुरवठा विभाग
मिराभाईंदर महानगरपालिका

4 जिस आदेश के विरूदध अपिल है उस आदेश कि प्रत व प्राप्त करने कि तारिख........ कोई भी जानकारी नहीं मिली
व कारण ......... नहीं मिली ......... ।

5 अपिल करने कि अतिम तारिख : ...... / / 2018 : आवेदन कि प्रत सल्गन :

6 अपिल कि पृस्टभुमी : समय पर नियमित जानकारी न देने के कारण

7 किस प्रकार मुख्य जानकारी चाहिए थी :

आवश्यक जानकारी का सुचना विवरण : निम्नलिखित जानकारियो कि संम्पुर्ण प्रत सविस्तार हमे प्रदान करवाये

**1. मिराभाईंदर महानगरपालिके अंतर्गत भुयारी गटार योजना कामातील त्रयस्थ लेखा परीक्षण अहवाल (Third Party Audit Report)च्या प्रति देण्यात यावी.**

8 : उस अधिकारी का नाम या कार्यालय का पता जहॉ से जानकारी चाहिए ।
शासकिय सुचना अधिकारी.

पाणी पुरवठा विभाग
मिराभाईंदर महानगरपालिका

BAJRANG PRAHAAR WEEKLY CHIEF EDITOR

स्थान : ठाणे
दिनांक : 09/04/2018

आवेदक का हस्ताक्षर

( एस आर तिवारी प्रधान संपादक बजरंग प्रहार )

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिल

---

मनपा/पापु/ ५० /(११४६)/२०१८-१९
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदीरा गांधी भवन,
मिरा भाईंदर महानगरपालिका , भाईंदर (प.) ४०११०१.
दिनांक – १४ /०५/२०१८.

श्री. एस आर तिवारी
लाल बहादुर शास्त्री नगर,
गल्ली नं. डी ०४, रुम नं. ३३१,
भाईंदर पोलिस स्टेशनच्या मागे,
भाईंदर पश्चिम, जिल्हा-ठाणे.
} अपिलकर्ते

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा,
उपअभियंता पाणी पुरवठा विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे.
} उत्तरवादी

| मुळ अर्जाचा दिनांक | प्रथम अपिलाच्या अर्जाचा दिनांक | प्रथम अपिलाच्या सुनावणीचा दिनांक | सुनावणीस उपस्थित |
|---|---|---|---|
| अर्ज दि.०६/११/२०१७ | अर्ज दि.०९/०४/२०१८<br>प्राप्त दि. २६/०४/२०१८ | दि.११/०५/२०१८ | अपीलकर्ता - उपस्थित<br>माहिती अधिकारी - उपस्थित |

## // पुर्वपिठीका //

केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. एस आर तिवारी यांनी दि.०६/११/२०१७ रोजी माहिती अधिकार अर्ज सादर केला होता. माहितीच्या अर्जात भुयारी गटार योजनेसंबंधी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी मनपाचे पत्र क्र. मनपा/पापु/२७७८/(१०८२)/२०१७-१८ दि.१३/११/२०१७ नुसार सदर अर्जास उत्तर देण्यात आले.

त्यावर श्री. एस आर तिवारी यांनी दि.०९/०४/२०१८ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला. या अपील अर्जाची दि.११/०५/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली. तसे अपिलकर्त्यांना मनपाचे पत्र क्र. मनपा/पापु/४२/(११४६)/२०१८-१९ दि.०३/०५/२०१८ नुसार कळविण्यात आले होते. त्यानुसार अपीलकर्ते श्री. एस आर तिवारी हे सुनावणीकरिता उपस्थित राहिले.

प्रेमलता तिवारी

JNNURM/PJP/MA/1547

9920936625

## // चर्चा //

श्री. एस आर तिवारी यांनी भुयारी गटार योजना कामातील त्रयस्थ लेखा परीक्षण अहवाल (Third Party Audit Report) संबंधी माहिती मागितली होती. अपिलकर्त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत माहितीबाबत उत्तर देवून विनामूल्य छायांकीत प्रती देखील उपलब्ध करुन दिल्या आहेत. सदर माहिती अपिलकर्त्यांना स्पिडपोस्ट द्वारे पाठविण्यात आली होती. परंतु पोस्टाने Unclaimed असा शेरा मारुन सदरचे पोस्ट जन माहिती अधिकाऱ्यांकडे परत पाठविले. त्यावर अपिलीय अधिकाऱ्यांनी सदरचे पोस्ट अपिलकर्त्यांना हातोहात देण्याचे आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी सदर पोस्ट अपिलकर्त्यांना सुनावणीच्या वेळी दिले व तशी पोच देखील घेण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलकर्त्यांना मुदतीत उत्तर दिले असून उपलब्ध अभिलेखांच्या छायांकीत प्रती देखील विनामूल्य दिल्या असल्यामुळे सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## // आदेश //

सदर अपील अर्जावर खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

- जन माहिती अधिकारी यांनी वेळेत उत्तर दिले आहे.
- जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलकर्त्यांना मुदतीत उत्तर दिले असून उपलब्ध अभिलेखांच्या छायांकीत प्रती देखील विनामूल्य दिल्या आहेत.
- भुयारी गटार योजनेबाबतची विस्तृत माहिती मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
- मनपाच्या www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर खालील माहिती देखील उपलब्ध आहे.
  (1) Tender Documents, (2) SPML Agreement,
  (3) Work Order, (4) CSMC Approval,
  (5) MPR-QPR,

सबब श्री. एस आर तिवारी यांचा दि. ०९/०४/२०१८ रोजीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

वरील आदेश आपणास मान्य नसल्यास याबाबत आपण मा. राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ, कोंकण भवन, नवी मुंबई. यांचे कडे द्वितीय अपिल दाखल करु शकता.

**स्थळ** :- मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईदर.
**दिनांक** :- ११ मे २०१८.

(सुरेश वाकोडे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग

प्रत :- १) **श्री. एस आर तिवारी,** लाल बहादुर शास्त्री नगर, गल्ली नं. डी ०४, रुम नं. ३३१, भाईंदर पोलिस स्टेशनच्या मागे, भाईंदर पश्चिम, जिल्हा-ठाणे.
२) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जेएनएनयुआरएम, मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.